Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ६, अंक ६] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी २०-२६, २०२०/फाल्गुन १-७, शके १९४१ [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ–नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २३.

### जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, यांजकडून

क्रमांक जिउनि-नियमन-कृउबास-वर्धा-१२५९-२०२०.—

महाराष्ट्र शासन, सहकार व कृषि विभागाचे अधिसूचना क्र. एप्रिल २०८१-३३६-४४०-११-स, दिनांक ५ सप्टेंबर १९८१ तसेच महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ४५(१) नुसार मला प्राप्त अधिकारानुसार मी, गौतम वालदे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा, याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समिती, वर्धा या बाजार समितीचे विद्यमान सभापती, श्री. श्याम भिमरावजी कार्लेकर यांना विचारणा करण्यात येते की, त्यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, वर्धा या बाजार समितीस आर्थिक नुकसान पोहोचवून त्यांना सभापती म्हणून नेमून दिलेले कर्तव्य पार पाडण्यात कसूर केला असल्यामुळे त्यांना कृषि उत्पन्न बाजार समिती, वर्धा च्या संचालक मंडळातून निष्कासित का करण्यांत येऊ नये ? याचे लेखी स्पष्टीकरण/खुलासा ही कारणे दाखवा नोटीस मिळाल्याचे तारखेपासून १५ दिवसाचे आत २ प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

तसेच, सदर प्रकरणी त्यांचे काही म्हणणे मांडावयाचे/ सादर करावयाचे असल्यास त्यांनी स्वतः अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीमार्फत दिनांक २४ फेब्रुवारी २०२० रोजी दुपारी २.०० वाजता माझे समक्ष माझे कार्यालयात उपस्थित राहावे.

सदर कारणे दाखवा नोटीस आज दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी निर्गमित करीत आहे.

**गौतम वालदे,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, वर्धा.

वर्धा :
दिनांक ४ फेब्रुवारी २०२०.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. २४.

**आदेश**

क्रमांक जिउनिभं-कृउबासतु-कलम ५७(३)-आदेश-५१५-२०२०.—

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम ५७ (४) नुसार व मा. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. सीएमआर-आर-ॲक्ट-रूल-८१, दि. १८ सप्टेंबर, १९८१ अन्वये निम्न स्वाक्षरीकारास प्राप्त अधिकारानुसार, मी, एम.एम. देशकर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, भंडारा याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समिती, तुमसर, जि. भंडारा या बाजार समितीच्या अंतर्गत शेतमाल खरेदी प्रकरणी बाजार फी व सुपरव्हिजन फी ची रक्कम बाजार समितीस येणे आहे किंवा कसे ? या बाबतचे प्रशनाचे निर्णयासाठी व त्या प्रयोजनासाठी न्यायाधिकरणामध्ये उक्त कायदा व त्याखालील नियमान्वये पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याकरीता श्री. विलास देशपांडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तुमसर, तालुका, जि. भंडारा यांची नियुक्ती करीत आहे.

सदरहु आदेश आज दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी पारित केला आहे.

भंडारा :
दिनांक २० जानेवारी २०२०.

**मनोज देशकर,**
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.